# महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे
# वार्षिक अहवाल 2019-20

शारीरिक शिक्षणाचा ध्यास घेऊन कॅ. कै. शिवरामपंत दामले यांनी पुण्यामध्ये १९२४ साली महाराष्ट्रीय मंडळाची स्थापना केली. शारीरिक शिक्षण व क्रीडा विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास करण्यासाठी शारीरिक शिक्षणाचे महाविद्यालय असावे असे स्वप्न त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच पाहिले त्याला मूर्त स्वरूप आले ते १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे १९७७ साली चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाची स्थापना झाली.

एखाद्या व्यक्तीमुळे एखादी संस्था नावारूपास येते तिच्या अथक प्रयत्नातून उत्तुंग स्वप्ने साकार होतात असे महाराष्ट्रीय मंडळाचे आद्य संस्थापक, कै. कॅ. शिवरामपंत दामले आणि मंडळाचे माजी सरकार्यवाह कै. रमेश दामलेसर यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करून महाविद्यालयाचा शै. वर्ष 2019-20 चा वार्षिक अहवाल सहर्ष सादर करीत आहे.

शै.वर्ष २०१९-२० हे महाविद्यालयाचे ४२ वे वर्ष आहे. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बी.पी.एड्., एम.पी.एड्., एम.फिल.(शारीरिक शिक्षण)(सुटीतील) व पीएच.डी.(शारीरिक शिक्षण) हे अभ्यासक्रम राबविले जातात. महाविद्यालय एन.सी.टी.ई. मान्यताप्राप्त असून नॅक पुनर्मूल्यांकित आहे.

- **ठळक वैशिष्ट्ये/विशेष कामगिरी**

1) शै. वर्ष २०१९-२० चा प्रथमसत्र प्रारंभ दि.०८ जुलै २०१९
2) बीपीएड् ८७.५% व एमपीएड्.निकालामध्ये विद्यार्थ्यांचे १००% यश
3) सेट - २०१९, ३० विद्यार्थी व नेट - २०१९:- ४ विद्यार्थी उत्तीर्ण
4) संशोधन प्रबंध लेखनासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शिका तयार केली (डॉ.आहेर.डॉ. देशपांडे व डॉ. प्रभू) (जुलै २०१९)
5) डॉ.शरद आहेर डॉ. श्रीकांत महाडिक, डॉ. महेश देशपांडे व डॉ.अमित प्रभू - एलएनयूपीई ग्वाल्हेर येथे ॲडव्हान्स स्ट्रेंथ ॲन्ड कंडिशनिंग विषयक आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग ( दि.२० ते २६ ऑगस्ट २०१९)
6) क्रीडादिन (२९ ऑगस्ट २०१९)- एस.डी. कटारिया शाळेच्या इ. ५ ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी विविध मैदानी क्रीडाबाबींची प्रात्यक्षिके व मार्गदर्शनसत्रे. मूकबधीर शाळा,व अंधशाळांमधील विशेष विद्यार्थ्यांसाठी फन गेम्स व फन रॅली आयोजित करून संपन्न.
7) डॉ.बी.एस.पोटे यांना सलग ३ वर्षे विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून कार्य केल्याबद्दल विद्यापीठाचे प्रशंसापत्र (दि.२८/८/२०१९)
8) अखिल भारतीय आंतरविद्यापीठस्तरावर क्रीडा सहभाग. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजन - आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा व्हॉलीबॉल -पुरूष व महिला हॅन्डबॉल पुरूष व महिला विभागीय आंतरविद्यापीठ बास्केटबॉल (मुली) १३ व १४ नोव्हेंबर २०१९.
9) आंतरराष्ट्रीय पुणे मॅरेथॉन मध्ये विद्यार्थ्याचा स्वयंसेवक म्हणून सहभाग (दि.१ डिसेंबर २०१९)
10) स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा (दि.७ डिसेंबर २०१९)
11) मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स व कॉमर्स, पुणे आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंत प्रोग्राम मध्ये डॉ. राजे व डॉ. देशपांडे याचा सहभाग (२५-११ ते १-१२-२०१९)
12) महाविद्यालयामध्ये Nutrition for Sports & Fitness कार्यशाळेचे आयोजन व असोसिएशन ऑफ स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस सायन्सेस संस्थेशी सामंजस्य करार (दि.०७ डिसेंबर २०१९)
13) मंगेश ठोमके या एमपीएड (द्रितीयवर्ष) च्या विद्यार्थ्याचा प्रामाणिकपणा
14) प्राचार्यांसाठी कार्यशाळा सहभाग, डॉ. एस.इ.कांगणे (दि.१० व ११ जाने.२०२०)

15) शारीरिक शिक्षण व क्रीडाशास्त्र विषयक मणिपाल विद्यापीठ, जयपूर येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. एस.एस.महाडिक, प्रा.के.के.उपाध्याय व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा सहभाग (दि.७–१२ जाने २०२०)

16) सिध्दीविनायक महाविद्यालय, कर्वेनगर आयोजित IQAR preparations for Teaching & Non Teaching staff State level workshop मध्ये आयक्यूएसी समन्वयक व शिक्षकेतर कर्मचा–यांचा सहभाग

17) बालिका दिन – २४ जानेवारी २०२०

18) ज्ञानप्रबोधेनीतील १० वी च्या विद्यार्थ्यांच्या शरीरिक क्षमता चाचण्यांचे आयोजन (दि.२५ जाने २०२०)

19) पुणे जिल्ह्यातील १०० शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सालाबादप्रमाणे Obsty Race चे आयोजन (२८ व २९ जानेवारी २०२०)

20) प्रा. कुमार उपाध्याय यांची पुणे ते सौराष्ट्र – सायकल सफारी (दि.२१ ते ३१ डिसेंबर २०१९)

21) पालक मेळावा (दि. २३ नोव्हे२०१९)

22) सा.फु.पुणे विद्यापीठ, (गुणवत्ता सुधार कार्यक्रम) अंतर्गत पार्किंग शेडसाठी अनुदान

23) परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प

24) राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये प्राध्यापकांचे यश ( दि.२० ते २४ नोव्हेंबर २०१९)

25) आर्टस,कॉमर्स सायन्स कॉलेज जालना येथील गांधीविचार अभ्यास शिबिरात ०३ विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग (दि.२९ जाने ते २ फेब्रु.२०२०)

26) खेलो इंडिया यूथ गेम्स २०२० मध्ये ज्युदो खेळात बीपीएड (प्रथमवर्ष) च्या गणेश लांडगे यांचा सहभाग

27) विद्यार्थी कल्याण योजनेअंतर्गत साहसी खेळ प्रशिक्षणाचे आयोजन (२० व २१ डिसेंबर २०१९)

28) SET Workshop आयोजन दि. ४ ते ७ मार्च २०२०

29) मराठी गौरव दिन – ग्रंथालय प्रदर्शन (दि. २७ फेब्रुवारी २०२०)

30) बोडके सर २३ व २४ ज़ाने.२०२०–राज्यस्तरीय कार्यशाळा–माशिक तज्ञ

31) देशपांडे १ फेब्रु.२०२० राष्ट्रीय चर्चासत्र शिवाजी कॉलेज, हिंगोली येथे सहभाग व श्रीपती कदम महाविद्यालय शिरवळ येथील राज्यस्तरीय कार्यशाळेत साधनव्यक्ती म्हणून सहभाग (दि.१० जाने २०२०)

32) महात्मा गांधी जयंती पंधरवडा संपन्न (दि.५ ते ८ फेब्रुवारी २०२०)

33) व्यायामशाळा निर्मिती आणि व्यवस्थापन प्रदर्शन – (दि.११ फेब्रु.२०२०)

34) Functional Fitness Workshop – राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन (दि.१५ फेब्रु.२०२०)

35) पदव्युत्तर विद्यार्थ्यांची Obsty पार या आंतरकुल उपक्रमाचे आयोजन (१८ फेब्रु.२०२०)

36) वैद्यकीय तपासणी शिबिर (दि.२० व २१ फेब्रु.२०२०)

37) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे २ कार्यशाळा (दि.२२ फेब्रुवारी २०२०)

38) महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी हेल्थ चेक–अप कॅंप (दि.२१ व २२ फेब्रु.२०२०)

39) डॉ. देशपांडे व डॉ.बोडके यांचा सा.फु.पुणे विद्यापीठाच्या रिफ्रेशर कोर्समध्ये साधनव्यक्ती म्हणून सहभाग

40) टॅब द लॅब – पदव्युत्तर विभागातर्फे ह्युमन परफॉर्मन्स लॅब साधनांचे प्रदर्शन व शारीरिक सुदृढता मापन चाचण्या (दि.२९ फेब्रुवारी २०२०)

41) महिलादिनानिमित्त योगासने,प्राणायाम व ध्यानशिबिर आणि स्वसंरक्षण तंत्रे प्रशिक्षण (दि.२ मार्च २०२०)

42) बी.पी.एड पदवीग्रहण समारंभ (दि.७ मार्च २०२०)

43) कोव्हिड १९ लॉक डाऊन काळात फेसबुक वर शारीरिक शिक्षण विषयक व्हेबिनारचे आयोजन

44) इएलएमएस स्पोर्ट्स फाऊंडेशन आयोजित फिजिकल लिअटरसी सेशनमध्ये प्राध्यापकांचा ऑनलाईन सहभाग (दि.४ ते ८ जून २०२०)

45) फ़ॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम मध्ये डॉ. शरद आहेर यांचा सहभाग (दि.३० मे ते ३ जून २०२०)

46) कोव्हिड १९ लॉकडाऊनमुळे शासन आदेशान्वये दि. १४ मार्च ते ३० जून २०२० या कालावधीत महाविद्यालय बंद

47) दि. २१ जून २०२० रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन ऑनलाईन पध्दतीने संपन्न

**गतवर्षीय परीक्षा फल : सालाबादप्रमाणे निकालामध्ये नेत्रदीपक यश**

| **अभ्यासक्रम** | **निकाल** |
|---|---|
| बीपीएड् (मे २०१८) | ८७.५% |
| एमपीएड्.(मे २०१८) | ९५.५% |

| **अभ्यासक्रम** | **2019-20 मधील उत्तीर्ण** | **2019-20 पर्यंत उत्तीर्ण** |
|---|---|---|
| **एम.फिल (शा.शि.)** | 07 | 100 |
| **पीअेच.डी.** | 04 | 36 |

| **सेट परीक्षा २०१९** | **नेट परीक्षा २०१९** |
|---|---|
| ३० विद्यार्थी उत्तीर्ण | ०४ विद्यार्थी उत्तीर्ण |

- **महाविद्यालयात व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वप्रथम (परीक्षा मे २०१९)**
  **बीपीएड – सौ.बेबी जगदाळे**
  **एमपीएड – कु.रोविता फर्नांडिस**
- **एम.फिल – कु. प्रीती सांगळे (मार्गदर्शक – डॉ. श्रीकांत महाडिक)**
- **श्री. डी.एस.लोंढे (मार्गदर्शक – डॉ. नयना निमकर )**
- **कु. मॅक्सिया फर्नांडिस (मार्गदर्शक – डॉ.महेश देशपांडे)**
- **श्री एमडी.लोकमन सैख (मार्गदर्शक – डॉ.शरद आहेर)**
- **श्री एमडी.मक्रारूल शेख (मार्गदर्शक – डॉ.महेश देशपांडे)**

- **पीएच.डी.–श्री राजोळे विक्रांत शंकरराव (मार्गदर्शक–प्राचार्य,डॉ.सोपान कांगणे)**

### ➢ प्रवेश

- **बी.पी.एड्.** या वर्षावधीत महाराष्ट्र शासनाच्या सीईटी द्वारे १०० विद्यार्थ्यांनी बी.पी.एड्. अभ्यासक्रम (प्रथमवर्ष) साठी प्रवेश घेतला आहे. बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या अनुदानित आहेत. बी.पी.एड्. अभ्यासक्रम (द्वितीयवर्ष) साठी ९० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. (प्रथमसत्रारंभ द्वितीयवर्ष ८ जुलै व प्रथमवर्ष – दि. ४ सप्टेंब्रर २०१९)
- **एम.पी एड.** (प्रथमसत्र) यावर्षी सीईटी द्वारे एमपीएड अभ्यासक्रमास ३४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर द्वितीयवर्ष मध्ये ३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
- **एम. फिल्.(शा.शि.)(सुटीतील अभ्यासक्रम)**
  एम.फिल.(सुटीतील)अभ्यासक्रम प्रवेशप्रक्रिया सा.फु.पुणे विद्यापीठाकडे आहे. या वर्षावधीत एम.फिल.(शा.शि.)(सुटीतील अभ्यासक्रम)प्रवेश झाले नाहीत. .
- **पीएच.डी.**
  जानेवारी २०२० मध्ये पीएच.डी साठी ०२ विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली आहे.

### ➢ क्रीडासहभाग

महाविद्यालयीन स्पर्धासामन्यांमध्ये एकूण ९ सांघिक क्रीडाबाबी व ५ वैयक्तिक क्रीडास्पर्धामध्ये आमच्या खेळाडूंचा सहभाग होता.

- **क्रीडास्पर्धा प्राविण्य**
  1) आंतरविद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांचा उत्तम सहभाग
  2) सलग २४ व्या वर्षी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये यश

**आंतरमहाविद्यालयीन सहभाग -**

| अ.क्र | बाब | बीपीएड प्रथमवर्ष | | बीपीएड द्वितीयवर्ष | | एमपीएड प्रथमवर्ष | | एमपीएड द्वितीयवर्ष | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | |
| 1 | ॲथलेटिक्स | 9 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **11** |
| 2 | कुस्ती | 0 | 1 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | **3** |
| 3 | ज्युदो | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | **1** |
| 4 | बॉक्सिंग | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **1** |
| 5 | बुद्धिबळ | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **3** |
| 6 | बास्केटबॉल | 4 | 0 | 6 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | **12** |
| 7 | खो खो | 1 | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **04** |
| 8 | हॅन्डबॉल | 7 | 9 | 5 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | **22** |
| 9 | फूटबॉल | 7 | 6 | 9 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | **28** |
| 10 | व्हॉलीबॉल | 4 | 6 | 6 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | **21** |
| 11 | कबड्डी | 3 | 7 | 8 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | **23** |
| 12 | बेसबॉल | 1 | 0 | 2 | 0 | 3 | 0 | 0 | 0 | **3** |
| 13 | सॉफ्टबॉल | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **02** |
| 14 | बॉलबॅडमिंटन | 2 | 1 | 4 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | **12** |
| | | **43** | **34** | **50** | **26** | **3** | **0** | **0** | **0** | **156** |

**आंतरमहाविद्यालयीन सांघिक यश -**

| अ.क्र | बाब | सांघिक यश | |
|---|---|---|---|
| | | मुले | मुली |
| 1 | ॲथलेटिक्स | सहभाग | सहभाग |
| 2 | हॅन्डबॉल | तृतीय | द्वितीय |
| 3 | फूटबॉल | सहभाग | द्वितीय |
| 4 | कबड्डी | द्वितीय | सहभाग |
| 5 | खो खो | सहभाग | सहभाग |
| 6 | बेसबॉल | सहभाग | - |
| 7 | सॉफ्टबॉल | सहभाग | - |
| 8 | व्हॉलीबॉल | प्रथम | तृतीय |
| 9 | बॉलबॅडमिंटन | तृतीय | द्वितीय |

## आंतरमहाविद्यालयीन वैयक्तिक यश

| अ.क्र | बाब | यश | |
|---|---|---|---|
| | | मुले | मुली |
| 1 | कुस्ती | - | सुवर्ण |
| 2 | ज्युदो | सुवर्ण | सुवर्ण |
| 3 | योगा | - | सहभाग |
| 4 | बॉक्सिंग | सुवर्ण | - |
| 5 | रोप मल्लखांब | - | सहभाग |

**आंतरविभागीय सहभाग -**

| अ.क्र | बाब | बीपीएड प्रथमवर्ष | | बीपीएड द्वितीयवर्ष | | एमपीएड प्रथमवर्ष | | एमपीएड द्वितीयवर्ष | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | | | मुले | मुली |
| 1 | हॅन्डबॉल | 0 | 5 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **8** |
| 2 | फूटबॉल | 0 | 1 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | **3** |
| 3 | व्हॉली बॉल | 0 | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **4** |
| 4 | बॉलबॅडमिंटन | 0 | 1 | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | **4** |
| 5 | ज्युदो | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | **3** |
| 6 | कुस्ती | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | **2** |
| 7 | ॲथलेटिक्स | 4 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **5** |
| 8 | खो खो | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **2** |
| 9 | कबड्डी | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **2** |
| 10 | बास्केटबॉल | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **1** |
| 11 | योगा | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **1** |
| 12 | बॉक्सिंग | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **1** |
| | | **6** | **11** | **12** | **7** | 0 | 0 | 0 | 0 | **36** |

**अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय सहभाग -**

| अ.क्र | क्रीडाबाब | बीपीएड प्रथमवर्ष | | बीपीएड द्वितीयवर्ष | | एमपीएड प्रथमवर्ष | | एमपीएड द्वितीयवर्ष | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | |
| 1 | फूटबॉल | 0 | 2 | 0 | 1 | 0 | 0 | | | **3** |
| 2 | व्हॉली बॉल | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **2** |
| 3 | हॅन्डबॉल | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **6** |
| 4 | बॉक्सिंग | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **1** |
| 5 | ज्युदो | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **1** |
| | | **2** | **9** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **13** |

**खुल्या स्पर्धांमधील वैयक्तिक कामगिरी**

| अ.क्र | नांव | अभ्यासक्रम | क्रीडा बाब | स्तर | कामगिरी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री गणेश लांडगे | बीपीएड प्रथमवर्ष | ज्युदो | राष्ट्रीय स्पर्धा २०२० | सहभाग |
| 2 | श्री राकेश जाधव | बीपीएड | मार्शल आर्टस | राज्यस्तरीय २०१९ | प्रथम क्रमांक (सुवर्ण) |
| 3 | श्री रोहन पवार | बीपीएड | तायक्वोंदो | राष्ट्रीय २०१८ | प्रथम क्रमांक (सुवर्ण) |
| 4 | कु. शिल्पा म्हात्रे | बीपीएड | कुस्ती<br>कुस्ती<br>ज्युदो | राष्ट्रीय<br>जिल्हास्तरीय<br>राज्यस्तरीय<br>(2018-19) | तृतीय क्रमांक (कांस्य)<br>द्वितीय क्रमांक (रजत)<br>तृतीय क्रमांक (कांस्य) |
| 5 | कु. रिमादेवी शेळके | बीपीएड | कुस्ती | राज्यस्तरीय<br>जिल्हास्तरीय (2018) | तृतीय क्रमांक (कांस्य)<br>सहभाग |

- **स्पोर्टस स्कॉलरशीप**

खालील खेळाडू विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्पोर्टस स्कॉलरशीप जाहीर झाली आहे

| अ.क्र | नांव | अभ्यासक्रम | क्रीडा बाब | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री भांगले पियुष | बीपीएड प्रथमवर्ष | खो खो | २,०००/- |
| २ | कु.राशी धुलिया | बीपीएड प्रथमवर्ष | हॅन्डबॉल | ३,०००/- |
| ३ | कु. करपे शीतल | बीपीएड प्रथमवर्ष | हॅन्डबॉल | ३,०००/- |
| ४ | कु.खडका माया | बीपीएड प्रथमवर्ष | हॅन्डबॉल | ३,०००/- |
| ५ | श्री गणेश लांडगे | बीपीएड प्रथमवर्ष | ज्युदो | १५०००/- |
| ६ | कु.तिरके जेनिफर | बीपीएड प्रथमवर्ष | हॅन्डबॉल | ३,०००/- |
| ७ | कु. मात्रे शिल्पा | बीपीएड द्वितीयवर्ष | ज्युदो | ५,०००/- |

**खेळाडू प्राध्यापकांचे राज्यस्तरीय स्पर्धांमधील यश –**

महाराष्ट्र मास्टर्स गेम्स असोसिएशन पिंपरी चिंचवड यांनी दि. २० ते २४ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत आयोजित केलेल्या ॲथलेटिक्स, बास्केटबॉल व फुटबॉल स्पर्धांमध्ये खालील प्राध्यापकांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

१) डॉ. बालाजी पोटे – उंच उडी (द्वितीय क्रमांक) भालाफेक – तृतीय क्रमांक

२) डॉ. शरद आहेर – ट्रिपल जंप (द्वितीय क्रमांक)

३) डॉ. श्रीकांत महाडिक – १०० मी व २०० मी (तृतीय क्रमांक) ४x१०० रिले व फुटबॉल (प्रथम क्रमांक)

४) डॉ. अमित प्रभू – बास्केटबॉल ((द्वितीय क्रमांक)

- **पंच कार्य**

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांखेरीज आमचे खेळाडू विद्यार्थी अनेक राष्ट्रीय/ राज्यस्तरीय /जिल्हास्तरीय खुल्या क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होऊन पंचकार्य करतात. रोख पारितोषिके मिळवितात व स्वकष्टार्जित कमाई करून शिक्षणाचे शुल्क भरतात.

दि. ३० जानेवारी २०२० रोजी महाराष्ट्रीय मंडळाने गुलटेकडी क्रीडासंकुलात आयोजित केलेल्या आंतर शालेय ॲथलेटिक्स स्पर्धामध्ये महाविद्यालयातील पदव्युत्तर विभागाच्या विद्यार्थ्यांनी पंचकार्य केले.
प्रा. शिरिष मोरे आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा व पंचकार्य विभाग सांभाळतात.

- **स्वयंसेवक कार्य**

दि.२९ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२० दरम्यान आर्टस, सायन्स, कॉमर्स महाविद्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या १६ व्या राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबिरामध्ये बीपीएड (द्वितीयवर्ष) चे श्री अक्षय शिंदे आणि निलेश शिंदे यांनी स्वयंसेवक म्हणून कार्य केले.

दि. १ डिसेंबर २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय पुणे मॅरेथॉन मध्ये बीपीएड (प्रथम व द्वितीयवर्ष)च्या विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग घेतला. एमपीएड प्रथमवर्षच्या विद्यार्थ्यांनी मार्गिका मापन व वाहतुक नियमन केले. महाराष्ट्रीय मंडळ आयोजित शालेय विद्यार्थ्यांच्या मैदानी स्पर्धांमध्ये एमपीएड प्रथम व द्वितीयवर्ष च्या विद्यार्थ्यांनी ग्राऊंड मार्किंग व पंचकार्य केले. (दि.२९ व ३० जाने.२०२०) .

- **महाविद्यालय विकास समिती**

विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालय विकास समिती अस्तित्त्वात असून या वर्षावधीत समितीच्या दोन सभा आयोजित करण्यात आल्या. (दि.११/०९/२०१९ व दि.२५ फेब्रुवारी २०२०)

- **अंतर्गत गुणवत्ता मूल्यांकन कक्ष**

. महाविद्यालयामध्ये गुणवत्ता सुधार व नियमनाबाबत करावयाच्या वाटचालीसाठी अंतर्गत गुणवत्ता मूल्यांकन कक्ष अस्तित्त्वात असून वर्षावधीत या समितीच्या तीन सभा आयोजित करण्यात आल्या.ज्यामध्ये गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने ध्येय धोरणे ठरवून कार्यवाही करण्यात आली. (दि.१२/०७/२०१९, १४/११/२०१९ व २० जून २०२०)

- **आयोजन**

यंदा २९ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयात क्रीडादिन आगळ्यावेगळ्या पध्दतीने साजरा झाला. बीपीएड (द्वितीयवर्ष) च्या विद्यार्थ्यांनी कटारिया हायस्कूलमधील इ.५ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडाबाबींचे आयोजन व चर्चासत्राचे आयोजन केले. त्याचप्रमाणे मूकबधीर शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी फन गेम्स व फन रिले आयोजित करण्यात आले.

- **आंतरमहविद्यालयीन स्पर्धा**

महाविद्यालय, स्पर्धा सहभागाबरोबरच विविध स्तरीय स्पर्धांचे आयोजन करते. ह्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्पर्धा आयोजनाचाही अनुभव मिळतो.यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल – पुरूष व महिला, हॅन्डबॉल पुरूष व महिला,स्पर्धांचे तसेच दि. १३ व १४ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत आंतरविभागीय बास्केटबॉल (महिला) स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाने केले.

- **अडथळा शर्यत (**Obstyrace)

महाराष्ट्रीय मंडळाचे प्रमुख ध्येय म्हणजे समाजात खेळाचा, शारीरिक सुदृढतेचा आणि शारीरिक शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे.त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रीय मंडळ व चंद्रशेखर आगाशे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ व २९ जानेवारी २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या अडथळा शर्यतींचे उदघाटन सहपोलिस आयुक्त मा. डॉ.रविंद्र शिसवे यांच्या उपस्थितीत,महाराष्ट्रीय मंडळाचे सरकार्यवाह, श्री धनंजय दामले यांचे हस्ते झाले.या स्पर्धा आंतरशालेय प्रमाणे आंतरमहाविद्यालयीन स्तरावर आयोजित करण्यांत आल्या. पुणे जिल्हयातील मुलांच्या आणि मुलींच्या अशा एकूण ५४ शालेय व १६ महाविद्यालयीन संघांनी या स्पर्धेत उस्फुर्त सहभाग घेतला यामध्ये सुमारे १४५० विद्यार्थ्यांचा समावेश होता.

प्राथमिक फेरीमध्ये एकूण ११ अडथळे खेळाडूंना पार करावयाचे होते. ज्यामध्ये, सरपट्णे, तोल सांभाळणे, उंचावरुन चालणे व उडी मारणे, टायरमधुन जाणे, टायर वाहून नेणे, जाळ्यातून बाहेर पडणे, जाळी खालून जाणे इ. अडथळ्यांचा समावेश होता. पारितोषिक वितरण समारंभ कार्यवाह श्री धनंजय दामले यांचे उपस्थितीत संपन्न झाला. विजेत्या संघास रु.१०,०००/– उपविजेत्यास रु.७०००/– तर तृतीय संघास रु.५,०००/– रु.ची पारितोषिके करंड्क व प्रत्येक खेळाडूस पदके देऊन गौरविण्यांत आले. तर सर्व वेगवान खेळाडूंमधून सर्वात वेगवान स्पर्धा पूर्ण करणा–या खेळाडूस प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास अनुक्रमे रु.१०००/–, रु.७००/– व ५००/–ची रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. या उपक्रमाची शाळा, महाविद्यालये, पालकवर्ग, शिक्षक शारीरिक शिक्षण संचालक व माजी विद्यार्थी यांनी प्रशंसा केली.

## ➢ क्रीडादिन

दि.२९ ऑगस्ट हा दिवस हॉकीचे जादूगार व ऑलिंपियन खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन हॉकीपटू ध्यानचंद यांना मानवंदना देण्यासाठी हा दिवस, देशभरामध्ये राष्ट्रीय क्रीडादिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रीय मंडळ ही गेली ९५ वर्षे शिक्षण, शारीरिक शिक्षण व क्रीडक्षेत्रास समर्पित अशी संस्था. त्यामुळे संस्थेमध्ये, आमच्या महाविद्यालयातदेखील राष्ट्रीय क्रीडादिन अतिशय उत्साहात व जोषपूर्ण वातावरणात साजरा होतो. महाविद्यालय शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्राच्या प्रचार आणि प्रसारासाठी अनेक अभिनव उपक्रम राबविते. यंदा क्रीडादिनाच्या निमित्ताने, शालेय विद्यार्थ्यासाठी मैदानावर फन गेम्स व फन रिले या बाबींचे आयोजन करण्यात आले.

- **प्रजासत्ताक दिनाचे,** संस्थेच्या सहा शाळा व वाणिज्य महाविद्यालयासह एकत्रितपणे भव्य स्वरूपात आयोजन करण्यांत आले. यावेळी विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक प्रात्यक्षिके सादर केली.
- **आंतरकुल स्पर्धा**

  हा बीपीएड् अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणा–या भावी शिक्षकांसाठी अतिशय उपयुक्त कार्यक्रम. यामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धांचे आयोजन व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यांत येते. दर शनिवारी आयोजित होणा–या आंतरकुल स्पर्धांमध्ये बीपीएड व एमपीएडचे चे विद्यार्थी अतिशय हिरीरीने व उत्साहाने सहभागी होतात.
- **Nutrition for Sports & Fitness राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन**

  दि. ७ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालय आणि असोसिएशन ऑफ स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने **न्युट्रिशन फॉर स्पोर्टस ॲन्ड फिटनेस** ही राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. क्रीडा,शारीरिक सुदृढता आणि पूरक पोषक आहाराविषयी (न्युट्रिशन सप्लिमेंट्स) जागरूकता निर्माण करणे हा कार्यशाळेचा हेतू होता. कार्यशाळेचे उदघाटन सरकार्यवाह धनंजय दामले यांचे हस्ते संपन्न झाले. यावेंळी असोसिएशन ऑफ स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस सायन्सेस,मुंबई या संस्थेच्या संचालक मंडळाच्या उपाध्यक्ष, डॉ. सुभद्रा मंडलिक व डॉ.मीना गोधिया, सेक्रेटरी–डॉ.गीतांजली भिडे आणि न्युट्रा सप्लिमेंटचे मॅनेजिंग डायरेक्टर, प्रसन्न चौधरी व महाराष्ट्रीय मंडळाच्या शिक्षण संचालिका सौ. नेहा दामले उपस्थित होते. या

वेळी असोसिएशन ऑफ स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस सायन्सेस संस्थेशी विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणेविषयी चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने सामंजस्य करार केला. डॉ.उज्वला राजे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सदर कार्यशाळेत खालील अभ्याससत्रे संपन्न झाली.

- प्रथमसत्र – स्पोर्टस ॲन्ड फिटनेस न्युट्रिशन विषयावर रिलायन्स फाऊंडेशनच्या क्रीडावैद्यक केंद्राच्या आहारतज्ञ मिथिला खोपकर यांचे व्याख्यान झाले डॉ. शरद आहेर यांनी त्यांचा परिचय करून दिला.

- द्वितीयसत्र –स्पोर्टस ॲन्ड फिटनेस न्युट्रिशन संबंधी मार्गदर्शक तत्त्वे व त्यांचे घटक या विषयावर,अयक्ष हेल्थकेअर– मुंबईच्या क्रीडा आहारतज्ञ पल्लवी सावंत आणि आर्मी स्पोर्टस इस्टिट्यूटच्या क्रीडा आहारतज्ञ मिताली आंबेकर व स्नेहा राजे यांची व्याख्याने झाली डॉ. महेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

- पॅनेल चर्चा – यामध्ये भारतीय खेळाडूंच्या आहाराविषयीची आव्हाने व घ्यावयाची काळजी या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये डॉ. अजित मापारी, निलिमा गायकवाड, पल्लवी सावंत व अपूर्वा सुर्वे यांनी सहभाग घेतला. डॉ.श्रीकांत महाडिक यांनी सूत्रसंचालन केले.

- चतुर्थ सत्र –यामध्ये दोन व्याख्याने झाली १) विविध क्रीडाप्रकारांसाठी आवश्यक पूरक पोषकतत्त्वे– डॉ. गीतांजली भिडे : आर्मी रोईंग नोड २) डोपिंगविषयीची जागरूकता – प्रसन्न चौधरी :एम.डी. न्युट्रा सप्लिमेंटस. प्रा.शिरिष मोरे यांनी सत्राचे सूत्रसंचालन केले.

.

- कार्यशाळेमध्ये, शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रातील मान्यवर, खेळाडू, क्रीडामार्गदर्शक, प्राध्यापक, शिक्षक,विद्यार्थी व त्यांच्या शारीरिक सुदृढतेविषयी जागरूक पालकवर्ग यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान कांगणे या कार्यशाळेचे संचालक होते. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अमित प्रभू यांनी विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यशाळेचे नियोजन केले.

- **State Level Workshop - FUNCTIONAL FITNESS**

  महाराष्ट्रीय मंडळाचे, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय आणि फिट टू स्पोर्टस यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यात्मक तंदुरूस्ती (Functional Fitness) या विषयावर, दि.१५ फेब्रुवारी २०२० रोजी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यात्मक तंदुरुस्ती विकासासाठी उपयुक्त तंत्रे व सराव याविषयी जागरूकता निर्माण करणे हा कार्यशाळेचा उद्देश होता. क्रीडावैद्यकशास्त्रातील (स्पोर्टस मेडिसिन) नामांकित तज्ञांनी कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

- डॉ. अजित मापारी –कार्यात्मक तंदुरूस्तीची ओळख करून देताना त्यांनी त्याचे महत्त्व आणि गैरसमज स्पष्ट केले.
- मुक्ता प्रभुणे – मूलभूत हालचाल तपासणी महत्त्व आणि कार्यपध्दती व चाचण्या प्रात्यक्षिकांद्वारे स्पष्ट केल्या.
- सिध्दार्थ सरपोतदार – कार्यात्मक तंदुरूस्तीच्या प्रशिक्षणात केटलबेल्सचे महत्त्व त्याचे मुलभूत व्यायामप्रकार यांचे प्रात्यक्षिक सादर केले.
- मेघन बेलसरे – कार्यात्मक तंदुरूस्तीसाठी आदर्श व्यायाम पवित्रा कसा असावा याचे प्रात्यक्षिक व सराव करून घेतला.

- मीनल जैन – स्टिक मोबिलिटी : स्टिकच्या सहाय्याने आयसोमेट्रिक स्नायू आकुंचन करून विविध व्यायामप्रकारांचे सादरीकरण केले.

कार्यशाळेस, खेळाडू, क्रीडामार्गदर्शक, प्रशिक्षक, प्राध्यापक,शिक्षक व विद्यार्थी असे एकूण १७५ जण उपस्थित होते. कार्यात्मक तंदुरूस्तीच्या मुलभूत व्यायामप्रकारामध्ये अचूकता कशी आणावी आणि विकास कसा करावा तसेच व्यक्तिनिष्ठ व खेळानुसार त्यात कसे बदल करावेत याचे उत्तम मार्गदर्शन कार्यशाळेमध्ये करण्यात आले. अशा कार्यशाळांचे आयोजन नेहमी करण्यात यावे असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. सोपान कांगणे या कार्यशाळेचे संचालक तर डॉ. उज्वला राजे समन्वयक होत्या. कार्यशाळा यशस्वी करण्यास सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थीवृंदाने सहकार्य केले.

- **अभिनव अध्यापन पध्दती कार्यशाळा**

विषय अध्यापनाच्या विविध पध्दतीं या विषयावर यासाठी प्राध्यापकांसाठी, डॉ. दत्तात्रेय तापकीर आणि त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, आयक्यूएसी अंतर्गत दि. ३० व ३१ जानेवारी २०२० दरम्यान दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समन्वयक – डॉ शरद आहेर यांनी कार्यशाळेचे आयोजन केले

- **महात्मा गांधी जयंती पंधरवडा**

दि.५ ते ८ फेब्रुवारी २०२० दरम्यान महाविद्यालयात खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले

१) टाकाऊ तून टिकाऊ वस्तू बनविणे कार्यशाळा – मार्गदर्शन – खुशबू प्रजापती (एमपीएड द्वितीयवर्ष) (दि.५ व ६/२/२०२०)

२) चित्रकला स्पर्धा व वक्तृत्त्व स्पर्धा (दि.७/२/२०२०)

३) मराठी भाषा संवर्धन कार्यशाळा – यामध्ये शुध्दलेखन स्पर्धा,निबंध स्पर्धा व चर्चासत्र विषय : म.गांधींचे जीवन व कार्य (दि.८/२/२०२०)

- **मराठी भाषा गौरव दिन**

२७ फेब्रुवारी हा विख्यात ज्ञानपीठ पारितोषिक विजेते साहित्यिक, नाटकखार व कविश्रेष्ठ कै. वि..वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन शासनाच्या आदेशानुसार मराठी गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने महाविद्यालयात डॉ. वंदना बोकील यांचे मराठी व्याकरणाचे नियम या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले तसेच अचूक शुध्दलेखनाची स्पर्धा घेण्यात आली.

- **माजी विद्यार्थी संघटनेतर्फे दोन कार्यशाळांचे आयोजन –**

महाविद्यालयाची माजी विद्यार्थी संघटना कार्यान्वित झाली असून दि. २२ फेब्रुवारी २०२० रोजी माजी विद्यार्थी संघटनेतर्फे दोन कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यापैकी एक कार्यशाळा शालेय शारीरिक शिक्षकांसाठी होती विषय – Learning & Teaching Physical Activities through recreational minor & modified games

दुसरी कार्यशाळा महाविद्यालयांमधील शारीरिक शिक्षण संचालकांसाठी होती त्यामध्ये पुणे विद्यापीठातील **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा योजना** या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले.

**हेल्थ चेक–अप कॅंप** (दि. २६ व २७ फेब्रु.२०२०) डॉ. लाल पॅथलॅब्ज, महर्षिनगर,पुणे यांच्या सहकार्याने बीपीएड व एमपीएडचे एकूण १८७ विद्यार्थी व १७ प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचा–यांसाठी हेल्थ चेक–अप कॅंप आयोजित करून रक्तातील विविध तपासण्या करण्यात आल्या

- **पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आंतरकुल स्पर्धा (Obsty Par)**

  एमपीएडच्या विद्यार्थ्यांसाठी या अनोख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. एकमेकांशी स्पर्धा न करता एकमेकांच्या सहकार्याने येणा-या अडथळ्यांवर मात करणे ही संकल्पना या स्पर्धांमागे होती. त्यासाठी चार अवघड अडथळे तयार करण्यात आले. व ते विद्यार्थ्यांनी एकमेकांना सहकार्य करत उत्तमरित्या पार केले. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यामधील नेतृत्त्वगुण, सहकार्य व सर्वसमावेशकवृत्ती विकसित होण्यास मदत झाली.

- **महिला दिनानिमित्त स्वसंरक्षण तंत्रे व योग, ध्यान आणि प्राणायाम कार्यक्रम**

  महिलादिनाचे औचित्य साधून खास महिलांसाठी दि.२ मार्च २०२० रोजी स्वसंरक्षण तंत्राचे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला प्रशिक्षकांनी संकटप्रसंगी महिलांनी स्वत:चे रक्षण कसे करावे याबाबत सोपी तंत्रे शिकविली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय योगतज्ञ डॉ. पल्लवी कव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या ध्यान, प्राणायान आणि योगासन कार्यक्रमामध्ये बीपीएडच्या ६० विद्यार्थिनी, ३४ विद्यार्थी आणि ३० योगाभ्यासक अशा एकूण १२४ जणांनी सहभाग घेतला. डॉ. उज्वला राजे कार्यक्रमाच्या समन्वयक होत्या.

- **विस्तार विभागा अंतर्गत शॉर्ट टर्म कोर्सेस**

  विद्यार्थ्यांना शा.शि. व फिटनेस क्षेत्रातील बदलत्या ट्रेंडविषयी अत्याधुनिक शिक्षण मिळण्यासाठी महाविद्यालयाच्या विस्तारविभागा अंतर्गत बीपीएडच्या विद्यार्थ्यांसाठी खालील ॲडऑन कोर्सेस घेण्यात आले.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | मार्गदर्शक |
|---|---|---|
| १ | जिम इन्स्ट्रकर | दर्शन वाघ |
| २ | योग इन्स्ट्रक्टर | निलेश यादव |
| ३ | ॲरोबिक्स इन्स्ट्रक्टर | अश्विनी कुलकर्णी |

- **प्रबोधनवर्ग/प्रशिक्षणवर्ग**

  यंदा प्राध्यापकांसाठी महाविद्यालयामध्ये आय.क्यू.ए.सी च्या वतीने डॉ. दत्तात्रेय तापकीर यांच्या नेतृत्तवाखाली दि.२५ जानेवारी २०२० रोजी विषय अध्यापनाच्या अभिनव पधदती या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यांत आले व्याख्यान व प्रात्यक्षिके असे या कार्यशाळेचे स्वरूप होते.

- **छात्रसेवा उपक्रम**

  बीपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी छात्रसेवा (इंटर्नशीप) कार्यक्रम विद्यार्थ्यांना थेट शाळेत शिकविण्याचा अनुभव मिळण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यांत येतो. महाराष्ट्रातील शाळांमध्ये, विद्यार्थ्यांना आवडतील अशा रितीने शारीरिक शिक्षणाचे तास घेण्यात यावेत या उद्देशाने,दि.२१ डिसेंबर ते १ फेब्रुवारी २०२० या कालावधीत विद्यार्थ्यांना पुण्याव्यतिरिक्त,स्वत:च्या गावातील शाळांमध्ये, महाविद्यालयात शिकविल्या जाणा-या आधुनिक उपक्रमांची ओळख करून देण्याचा हा यशस्वी प्रयत्न होता. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये,शारीरिक शिक्षणाचे तासा बरोबरच प्रजासत्ताकदिनाची प्रात्यक्षिके बसविणे, स्पर्धा /सामन्यांचे आयोजन करणे अशा जबाबदा-यांचा अनुभव घेतला.

- **शिबिर, सहली**

  डॉ. अमित प्रभू यांच्या नेतृत्त्वाखाली बीपीएड (प्रथम व द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची सहल सिंहगड येथे गेली. तर शिबिर स्नेहसेवा येथे नेण्यात आले. वॉटर पार्क लोणावळा येथे बीपीएड (प्रथमवर्ष) येथे शैक्षणिक सहल नेण्यात आली. आर्मी स्पोर्टस इन्स्टिट्यूट येथे प्रा. कुमार उपाध्याय यांच्या सह पदव्युत्तर विभागाची भेट (१७ फेब्रु.२०२०)

- **टूर दे डॅम**

शै. वर्ष २०१९–२० मध्ये एमपीएड प्रथम व द्वितीयवर्ष विद्यार्थ्यांची टूर दे डॅम ही सायकल ट्रीप दि.४ व ५ ऑक्टोबर २०१९ या कालवधीत आयोजित करण्यात आली. निसर्गाशी जवळीक साधणे, ग्रामीण जनजीवन अनुभवणे, तेथील शालेय विद्यार्थ्यांशी संपर्क साधणे, सायकलीसारख्या प्रदूषणमुक्त प्रवाससाधनांचा वापर करून शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्याचा विकास साधणे, सहजीवनातून जीवनामूल्यांचा विकास करणे या उद्देशाने पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. आहेर व प्रा. कुमार उपाध्याय यांनी सायकल सफारीचे आयोजन केले.

पहिल्या दिवशी महाविद्यालय–कात्रज घाट–कापूरव्होळ,नेकलेस पॉईंट– भाट्घर डॅम– कान्होजी जेधे वाडा – भोर स्काऊट ग्राउंड असा प्रवास करून दिवस अखेर सायंकाळी भोर येथील स्काऊट ग्राउंड येथे मुक्काम करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी जीवनमूल्यांवर आधारीत कार्यक्रम सादर केले.या कार्यक्रमाचे नियोजनास संदीप जाधव,विजय थिटे,अक्षय भुजबळ,वैभव कांडेकर व नामदेव बन्ने या माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.भोजनानंतर विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेस चालना देणारे विविध उपक्रम राबविण्यात आले.

दुस–या दिवशी सकाळी विद्यार्थ्यांनी रोहिडा किल्ल्यास भेट दिली. चंद्रशेखर आगाशे शा.शि.महाविद्यालयामध्ये सायकल सहलीची सांगता झाली. एकूण १९० कि.मी. चा हा प्रवास सायकलवीरांनी यशस्वीरित्या पूर्ण केला या सहलीत ६० मुलामुलींनी सहभाग घेतला. सा.फु. पुणे विद्यापीठाच्या सहलीचे निकषांच्या पूर्ततेसह सदर सहल आयोजित करण्यात आली या सहलीमध्ये डॉ. पोटे, डॉ. प्रभू प्रा.उपाध्याय व प्रा.तांबे यांनी सहभाग घेतला, प्रा. उपाध्याय सहल प्रमुख होते. सहलीस प्राचार्य डॉ. कांगणे व पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. आहेर यांनी शुभेच्छा दिल्या.

- **पदवी प्रदान समारंभ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आदेशानुसार महाविद्यालयामध्ये बी.पी.एड.(शारीरिक शिक्षण) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा पदवीग्रहण समारंभ आयोजित करण्यांत येतो. यंदा ५८ विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान दि. ७ मार्च २०२० रोजी संस्थेचे कार्यवाह श्री धनंजय दामले आणि प्रसिध्द समाजसेविका रेणूताई गावस्कर यांच्या उपस्थितीमध्ये थाटात संपन्न झाला.

- **आंतरराष्ट्रीय योग दिन**

कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे शासन आदेशान्वये महाविद्यालये बंद असल्यामुळे दि २१ जून २०२० रोजी आंतरराष्ट्रीय योगतज्ज्ञ डॉ. पल्लवी कव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योगदिन ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाला. यामध्ये योगासने, सूर्यनमस्कार व प्राणायाम यांचा समावेश होता. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व आमचे बीपीएड/एमपीएडचे विद्यार्थी शिक्षक या कार्यक्रमात सहभागी झाले.

## विद्यार्थी विकास योजना

- **कमवा व शिका योजना**

सा.फु.पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या विविध योजनातर्गत कमवा व शिका, सेट मार्गदर्शन कार्यशाळा व साहसी क्रीडाप्रकार प्रशिक्षण या योजना महाविद्यालयाने राबविल्या. कमवा व शिका योजनेमध्ये निवडसमितीद्वारा बी.पी.एड्. (प्रथम व द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या एकूण ३६ विद्यार्थ्यांची आर्थिक गरजेनुसार निवड करण्यांत आली. वैयक्तिक माहिती घेऊन गरजू विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी करून घेतले. विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल शालेय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका,व सायंकालीन क्रीडावर्ग राबविणे, ग्रंथालय,संगणककक्ष,साहित्यखोली, क्रीडांगण इत्यादींची देखभाल, वृक्षसंवर्धन अशी उत्साहाने कामे केली. डॉ बी एस. पोटे या योजनेचे समन्वयक आहेत.

- **साहसी खेळ प्रशिक्षण कार्यशाळा**

बीपीएड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीशिक्षक़ांमध्ये साहसीवृत्तीचे संवर्धन करण्यासाठी साहसी खेळ प्रशिक्षण कार्यशाळा दि. २१ व २२ डिसेंबर २०१९ या कालावधीत महाविद्यालयात आयोजित करण्यांत आली. डॉ. अमित प्रभू आणि त्यांचे सहका–यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.या वर्गाचे संयोजन डॉ बालाजी पोटे यांनी केले.

- **राज्यस्तरीय पात्रता चाचणी मार्गदर्शन कार्यशाळा (सेट वर्कशॉप)**

  पद्व्युत्तर विद्यार्थ्यांना रोजगारसंधीसाठी आवश्यक असलेल्या SET परीक्षा मार्गदर्शनासाठी दि. ४ ते ७ मार्च २०२० या कालावधीत समन्वयक –डॉ शरद आहेर यांनी महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक, सा.फु.पुणे विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील व टिळक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापकांच्या सहाय्याने यशस्वीरित्या सेट कार्यशाळेचे आयोजन केले. ५२ विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.विद्यार्थी विकास मंडळ सा.फु.पुणे विद्यापीठ व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यशाळा संपन्न झाली.

- **अंतर्गत तक्रार निवारण समिती**

  महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती अस्तित्त्वात असून ही समिती विद्यार्थ्यांच्या तक्रारींची वेळीच दखल घेऊन तक्रारींचे निवारण करण्याचे कार्य करते.

**राष्ट्रीय चर्चासत्रे कार्यशाळा, प्रमाणपत्र कोर्स इ. सहभाग**

**प्राचार्य डॉ.सोपान कांगणे व डॉ. श्रध्दा नाईक –**मॉडर्न कॉलेज गणेशखिंड आयोजित :" Innovative Practices in Higher Education" या विषयावरील राष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग (दि.२६ जुलै २०१९)

**प्राचार्य डॉ.सोपान कांगणे –** भीमाशंकर येथे विद्यापीठाने आयोजित केलेल्या प्राचार्यासाठीच्या कार्यशाळेत सहभाग घेतला त्याचप्रमाणे यूजीसी ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट आयओजित केआरटी आर्ट्स बीएच कॉमर्स ॲन्ड ए एम सायन्स महाविद्यालय नाशिक येथे महाविद्यालयीन प्राचार्य/संचालक यांचेसाठी आयोजित कार्यशाळेत सहभाग घेतला. (दि.१० व ११ जाने.२०२०)

**डॉ.शरद आहेर** –बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स येथे शारीरिक शिक्षण अध्यापनशैली या विषयावर व्याख्यान दिले.(दि. २२ जून २०१९)

आयक्युएसी सेल व फ़ॅकल्टी डेव्हलपमेंट कमिटी सतिश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज,ठाणे व मायक्रोसॉफ्ट यांनी आयोजित केलेल्या Faculty Development Program on 'Evolution from offline to online Teaching मध्ये सहभाग घेतला.(दि. ३० मे ते ३ जून२०२० )

**डॉ. उज्वला राजे –**यूजीसी ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर, सा.फु.पुणे विद्यापीठ आयोजित (दि.३ ते१३ जुलै २०१९) सॉफ्टस्किल्स फ़ॉर टिचर्स प्रोग्रॅम हा शॉर्टटर्म कोर्स पूर्ण केला.

डॉ. **श्रध्दा नाईक –** इंटरनॅशनल असोसिएशन फॉर फिजि.एज्यु. इन हायर एज्युकेशन न्यूयॉर्क यांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग घेऊन शोधनिबंध सादर केला.(दि. १९ ते २२ जून २०१९ )

**डॉ. योगेश बोडके –** सा.फु.पुणे विद्यापीठ आयोजित शॉर्टटर्म कोर्स साठी साधनव्यक्ती (दि.५ जुलै २०१९)
विषय – फिटनेस ॲन्ड टेक्नॉलॉजी

**डॉ.शरद आहेर डॉ. श्रध्दा नाईक व डॉ. महेश देशपांडे** – महाराष्ट्रराज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती येथे आरोग्य व शारीरिक शिक्षण इ.११ वी च्या समीक्षणसत्रात सहभाग घेतला (दि.२३ व २४ जुलै २०१९)

**डॉ.शरद आहेर डॉ. श्रीकांत महाडिक, डॉ. महेश देशपांडे व डॉ.अमित प्रभू –** एलएनयूपीई ग्वाल्हेर येथे ॲडव्हान्स स्ट्रेंथ ॲन्ड कंडिशनिंग विषयक आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग (दि.२० ते २६ ऑगस्ट २०१९)

**डॉ. महेश देशपांडे –** नेट/सेट मार्गदर्श कार्यशाळेत साधनव्यक्ती म्हणून सहभाग (दि. २९ फेब्रुवारी २०२०)

**पेपर प्रकाशित -** 1. Effect of application of Fitness App on Fitness of Physical Activity among Sedentary People from Barrackpore City in West Bengal. (Published in Original Research Aticle category in Vol.6; Issue 8; Aug.2019. in International journal of Research & Review)

कोव्हिड १९ लॉकडाऊन कालावधीमध्ये दि. २ जून २०२० रोजी शारीरिक शिक्षण विषयावर फेसबुक लाईव्ह व्हेबिनार आयोजित करण्यांत आला यामध्ये शारीरिक शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ शालेय शिक्षक, शारीरिक शिक्षण संचालक यांनी सहभाग घेतला

त्याचप्रमाणे दि. ४ ते ८ जून २०२० या कालावधीत ई.एल.एम.एस.स्पोर्टस फाऊंडेशनने आयोजित केलेल्या शारीरिक साक्षरता (Physical Literacy) ऑनलाईन सेशनमध्ये प्राचार्य डॉ. सोपान कांगणे यांचेसह सर्व प्राध्यापकांचा सहभाग होता. या चर्चासत्रामध्ये टेबलटेनिसचे विख्यात मार्गदर्शक मा. श्री पुल्लेला गोपीचंद यांचे बीजभाषण झाले.

- **प्राध्यापकांची कामगिरी**
  - प्राचार्य,डॉ. कांगणे – सा.फु.पुणे परीक्षा गैरप्रकार चौकशी समिती सदस्य .
  - डॉ. बालाजी पोटे – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण योजनेचे समन्वयक असून महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक आहेत.
  - डॉ.शरद आहेर, डॉ. महेश देशपांडे व डॉ. अमित प्रभू – पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यासाठी संशोधन प्रबंध मार्गदर्शिका तयार केली. डॉ.आहेर पदव्युत्तर विभाग प्रमुख म्हणून काम पहातात तसेच महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्षाचे समन्वयक आहेत (Coordinator-IQAC)
  - डॉ.आहेर व डॉ.बोडके –दि.२८ व २९ जानेवारी २०२० या कालावधीत पुणे जिल्ह्यातील शालेय व महाविद्यालयीन १५०० विद्यार्थ्यासाठी अडथळ्यांच्या शर्यतीचे यशस्वी आयोजन केले.
  - डॉ. उज्वला राजे शालेय पाठ विभागाचे व प्लेसमेंट सेलचे काम पहातात. महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार समिती अध्यक्ष आहेत.
  - डॉ. श्रद्धा नाईक –सिंबॉयोसिस आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आय.क्यू.ए.सी.सद्स्य असून हेल्थ ॲन्ड बायोलॉजिकल सायन्स शाखेअंतर्गत न्युट्रिशन डायटेटिक ॲन्ड स्पोर्टस सायन्सच्या पीएच.डी. प्रवेश समितीच्या सदस्य आहेत. डॉ.श्रध्दा नाईक महाविद्यालयातील पदाचा धारणाधिकार ठेवून ऑक्टोबर २०१९ पासून एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई येथे संचालक, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण पदावर कार्यरत आहेत.
  - डॉ. श्रीकांत महाडिक –विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि स्पोर्टस साहित्य विभाग सांभाळतात.ॲथलेटिक मीटचे समन्वयक. मैदान आखणीसाठी पीव्हीसी पाईपच्या सहाय्याने अल्पमोली पण बहुउपयोगी उपकरण तयार केले.
  - डॉ. एम.एन. देशपांडे संशोधन विभागाचे व विस्तार विभागाचे समन्वयक आहेत.
  - डॉ. योगेश बोडके यांनी महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तर विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध अर्थसहाय्य योजनांच्या प्रभावी व विश्वसनीय अंमलबजावणीसाठी पॉलिसी डॉक्युमेंट तयार केले. ह्युमन परफॉरमन्स लॅबचे समन्वयक आहेत.
  - डॉ. अमित प्रभू – महाविद्यालयाने आयोजित केलेल्या साहसी क्रीडाप्रकार (ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटी) कार्यशाळेत संसाधन व्यक्ती म्हणून सहभाग. (दि.२१ ते २४ डिसेंबर २०१९) दरवर्षी सिंबयोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाने आयोजित केलेल्या साहसी क्रीडाप्रकार कार्यशाळांमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून सहभाग.
  - प्रा. शिरिष मोरे आंतरमहाविद्यालयीन व आंतर विभागीय स्पर्धाविभाग व पंचकार्य विभाग सांभाळतात. आगाशियन्स या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव आहेत. शासकीय स्तरावर शारीरिक शिक्षण या विषयास न्याय मिळण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात.
  - प्रा. कुमार उपाध्याय यांची पुणे ते सोरटी सोमनाथ – सायकल सफारी दि.२१ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालवधीत यशस्वीपणे पार पाडली.भारतीय संस्कृतीचा, व भौगोलिक विविधतेचा अभ्यास करणे या हेतूने सायकल सफारी आयोजित करण्यात आली.सापुता–याच्या आदिवासी भागातून जाताना त्यांनी आपल्या माजी विद्यार्थ्यांच्या शाळेस भेट दिली. सायकल सफारीद्वारे त्यांनी व्यायाम, शारीरिक तंदुरूस्तीचे महत्त्व आणि व्यसनमुक्तीसाठी जनजागृती करून फिट इडिया ही संकल्पना जनमानसापर्यंत पोहोचविली.

• प्रा.सुमित तांबे – महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग सांभाळतात. आंतर्कुल स्पर्धा कार्यक्रमाचे संयोजन करतात

आमचे प्राध्यापक नेहमीच नियमित शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त अभिनव प्रयोग व संशोधन करतात. शारीरिक शिक्षणक्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. प्राचार्य व प्राध्यापक विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे परिषदा इ.मध्ये संशोधन निबंध, बीजभाषणे याद्वारा सहभाग घेतात. समाजात आरोग्य, व्यायाम व शारीरिक तंदुरुस्ती विषयक व्याख्यानांद्वारे, पुस्तकलेखन व अभिनव विधायक उपक्रमाद्वारे समाज प्रबोधन करतात.

आज मितीस महाविद्यालयात प्राचार्यांसह आठ प्राध्यापक पीएच.डी.प्राप्त आहेत.२ प्राध्यापकांचे काम पूर्णत्त्वाचे मार्गावर आहे. १२ प्राध्यापकांना पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त आहे. या वर्षावधीत प्राचार्य डॉ. सोपान कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली.

महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व वरिष्ठ लिपिक यांनी लोकसभा व विधामसभा निवडणुकांसाठी पुणे शहरामध्ये शासनातर्फे निवडणुक अधिकारी म्हणून काम केले.

मा. लेखाधिकारी, उच्चशिक्षण, पुणे विभाग यांचेतर्फे महाविद्यालयातील शिक्षकवर्गाची सेवापुस्तके पडताळणी करण्यात आली आहे.

- **सामंजस्य करार –**

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने तीन सामंजस्य केले.

१) क्रीडा विज्ञानक्षेत्रात वेगाने होणा–या बदलांचा विचार करता शै. वर्ष २०१९–२० मध्ये बीपीएड, एमपीएडचे विद्यार्थी, खेळाडू, क्रीडामार्गदर्शक, फिटनेस ट्रेनर्स व पालक यांचेसाठी क्रीडा, शारीरिक सुदृढता व पूरक पोषक आहार यातील अद्ययावत माहितीची ओळख करून देण्यासाठी व कौशल्य विकसनासाठी Sports Nutrition हा तीन महिने कालावधीचा प्रमाणपत्र वर्ग सुरू करण्यात आला आहे. या वेळी असोसिएशन ऑफ स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस सायन्सेस संस्थेशी विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणेविषयी असोसिएशन ऑफ स्पोर्ट्स न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस या संस्थेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

२) शारीरिक शिक्षण व क्रीडा वैद्यकशास्त्र यातील संशोधनाच्या विकासासाठी डॉ.अजित मापारी यांच्या फिट टू स्पोर्टस संस्थेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

३) डॉ.पल्लवी कव्हाणे यांच्या योग ॲन्ड आयुर्वेद प्रबोधिनी या संस्थेशी सामंजस्य करार झाला असून या अंतर्गत विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. (गर्भसंस्कार, न्युट्रिशन ॲन्ड त्रिदोष आणि रिस्ट्रोरेटिव्ह योग थेरपी)

- **अर्थसहाय्य**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमा अंतर्गत पर्किंग शेडसाठी रू.५,००,०००/– अनुदान मंजूर झाले. विद्यार्थी विकास योजनेअंतर्गत, कमवा शिका योजनेसाठी ७५,०००/– चे अनुदान मंजूर झाले. सेट मार्गदर्शन कार्यशाळेसाठी रू.१०,०००/– अनुदान मंजूर झाले.

- **क्रीडास्पर्धांमधील यश व पारितोषिके**

डॉ.बालाजी पोटे यांना गेली तीन वर्षे केलेल्या विद्यार्थी कल्याण योजनेच्या कामाबद्दल साफु.पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे प्रशस्तीपत्रक प्रदान कराण्यात आले. (जुलै २०१९)

प्रा. शिरिष मोरे – यांना महाराष्ट्रीय मंडळाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.(दि.२८ जुलै २०१९)

महाराष्ट्र मास्टर्स गेम्स असोसिएशन पिंपरी चिंचवड यांनी दि. २० ते २४ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत आयोजित केलेल्या ॲथलेटिक्स, बास्केटबॉल व फुटबॉल स्पर्धांमध्ये खालील प्राध्यापकांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

- डॉ. बालाजी पोटे – उंच उडी (द्वितीय क्रमांक) व भालाफेक – तृतीय क्रमांक
- डॉ. शरद आहेर – ट्रिपल जंप (द्वितीय क्रमांक)
- डॉ. श्रीकांत महाडिक – १०० मी व २०० मी (तृतीय क्रमांक) ४X१०० रिले व फुटबॉल (प्रथम क्रमांक)
- डॉ. अमित प्रभू – बास्केटबॉल ((द्वितीय क्रमांक)

महाराष्ट्रीय मंडळातर्फे क्रीडादिनाचे औचित्य साधून राज्य, राष्ट्रीय/खुल्या स्पर्धेत चमकलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला तसेच खालील खेळाडूंना क्रीडाप्राविण्यासाठी सन्मानित करण्यात आले.

**अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय स्पर्धा सहभाग**

| अ.क्र | नांव | अभ्यास क्रम | बाब | कामगिरी |
|---|---|---|---|---|
| 1 | वानखडे वंदना | बीपीएड | कॉर्फबॉल व हॅन्डबॉल | सहभाग |
| 2 | पवार ऐश्वर्या | बीपीएड | फूटबॉल | सहभाग |
| 3 | पवार वैष्णवी | बीपीएड | फूटबॉल | सहभाग |
| 4 | सोनवणे पूनम | बीपीएड | फूटबॉल | सहभाग |
| 5 | शिंदे राजश्री | बीपीएड | व्हॉली बॉल | सहभाग |
| 6 | मुसाद्दिक सिद्दिकी | बीपीएड | व्हॉली बॉल | सहभाग |
| 7 | गोंडिल गौरी | बीपीएड | कुस्ती | सहभाग |
| 8 | जगताप राणी | बीपीएड | कुस्ती | सहभाग |
| 9 | ठोंबरे वैभव | बीपीएड | सॉफ्टबॉल | सहभाग |
| 10 | मोरे अनिकेत | बीपीएड | बॉलबॅडमिंटन व हॅन्डबॉल | सहभाग |
| 11 | काळे कृष्णा | एमपीएड | मल्लखांब | सुवर्णपदक |
| 12 | गोंडिल गौरी | बीपीएड | ज्युदो | सहभाग |

**खुल्या स्पर्धांमधील वैयक्तिक कामगिरी**

| अ.क्र | नांव | अभ्यासक्रम | क्रीडा बाब | स्तर | कामगिरी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री राकेश जाधव | बीपीएड | मार्शल आर्टस | राज्यस्तरीय २०१९ | प्रथम क्रमांक (सुवर्ण) |
| 2 | श्री रोहन पवार | बीपीएड | तायक्वोंदो | राष्ट्रीय २०१८ | प्रथम क्रमांक (सुवर्ण) |
| 3 | कु. शिल्पा म्हात्रे | बीपीएड | कुस्ती<br>कुस्ती<br>ज्युदो | राष्ट्रीय<br>जिल्हास्तरीय<br>राज्यस्तरीय<br>(2018-19) | तृतीय क्रमांक (कांस्य)<br>द्वितीय क्रमांक (रजत)<br>तृतीय क्रमांक (कांस्य) |
| 4 | कु. रिमादेवी शेळके | बीपीएड | कुस्ती | राज्यस्तरीय<br>जिल्हास्तरीय (2018) | तृतीय क्रमांक (कांस्य)<br>सहभाग |

- **कॅंपस प्लेसमेंट**

  विद्यार्थ्यांना चांगल्या रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयातील रोजगारकक्षाद्वारे कॅंपस इंटरव्हयू आयोजित केले जातात. विविध नामांकित शाळा,महाविद्यालये, जिम व कंपन्यामध्ये आमच्या बीपीएड्. व एम.पी.एड् च्या विद्यार्थ्यांना नोक–या मिळतात. वर्षभर विद्यार्थ्याना नोकरी संदर्भात मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येते.डॉ.उज्वला राजे प्लेसमेंट विभागाच्या समन्वयक आहेत.

- **परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प**

  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी.पी.एड.व एम.पी.एड्.च्या परीक्षा व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे कार्य संचालक डॉ. सोपान कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्वाच्या सहकार्याने विहित मुदतीत पूर्ण झाले.

- **ग्रंथालय**

  या शैक्षणिक वर्षात ग्रंथालयात एकूण रू.63,254/- चे संदर्भग्रंथ,पुस्तके,नियतकालिके इ. खरेदी करण्यात आली.ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी 08 संगणक व वाय फाय सुविधा उपलब्ध आहे. या वर्षाअखेर ग्रंथालयामध्ये एकूण पुस्तके 11875, शीर्षके 10619 क्रमिक पुस्तके 455, संदर्भ ग्रंथ 4708,विश्वकोश 75, सीडी रॉम्स व व्ही.सी.डी 98 इ. उपलब्ध आहेत. बीपीएड प्रथम वर्ष विद्यार्थ्याना मेथडची इ.५ ते ९ वी ची क्रमिक शा.शि. हस्तपुस्तिका व संदर्भ पुस्तके कोर्स मटेरियलमध्ये देण्यात आली. द्वितीयवर्षच्या विद्यार्थ्याना संदर्भ पुस्तके कोर्स मटेरियलमध्ये देण्यात येणार आहेत. दि. २८ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयात ग्रंथालय प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

- **मान्यवरांच्या भेटी**

  मनसे अध्यक्ष म. राज ठाकरे, असोसिएशन ऑफ स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस सायन्सेस,मुंबई या संस्थेच्या संचालक मंडळाच्या उपाध्यक्ष, डॉ. सुभद्रा मंडलिक व डॉ.मीना गोधिया, सेक्रेटरी–डॉ.गीतांजली भिडे आणि न्युट्रा सप्लिमेंटचे मॅनेजिंग डायरेक्टर, प्रसन्न चौधरी, रिलायन्स फाऊंडेशनच्या क्रीडावैद्यक केंद्राच्या आहारतज्ञ मिथिला खोपकर अयक्ष हेल्थकेअर– मुंबईच्या क्रीडा आहारतज्ञ पल्लवी सावंत आणि आर्मी स्पोर्टस इस्टिट्यूटच्या क्रीडा आहारतज्ञ मिताली आंबेकर व स्नेहा राज, फिट २ स्पोर्टस चे संचालक डॉ. अजित मापारी, निलिमा गायकवाड, पल्लवी सावंत व अपूर्वा सुर्वे आर्मी रोईंग नोड्च्या डॉ. गीतांजली भिडे: पुणे शहर उपायुक्त डॉ. रविंद्र शिसवे,प्रसिध्द समाजसेविका रेणूताई गावस्कर या मान्यवरांनी विविध कार्यक्रमांच्या निनित्ताने महाविद्यालयास भेटी दिल्या.

- **सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्याने**

  वर्षभरातील गुरूपौर्णिमा,शारीरिक शिक्षण विचारांची दहीहंडी, रक्षाबंधन मकरसंक्रात,अशा सांस्कृतिक व स्वातंत्र्यदिन प्रजासत्तकदिन अशा राष्ट्रीय कार्यक्रमांबरोबरच प्रेरणादिन,क्रीडादिन, देशभक्तिपर गीते, मराठीगौरव दिन,हिंदी दिन, महिला दिन, संविधान दिन, राष्ट्रीय सण, आणि बीपीएड पदवीग्रहण समारंभ ऑनलाईन योगदिन या कार्यक्रमांचा समावेश होता.

  वर्षभरात आयोजित करण्यात आलेली विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने खालीलप्रमाणे

| अ.क्र. | व्याख्यात्याचे नाव | विषय |
|---|---|---|
| १ | डॉ. रमेश पानसे | ज्ञानतत्त्वाचा वाद (दि.१२ जुलै २०१९) |
| २ | डॉ. अजितकुमार जनाझ | गुरुपौर्णिमा (दि.१६ जुलै २०१९) |
| ३ | श्री दत्तू भोकनळ | आंतरराष्ट्रीय रोईंग चॅम्पियनची काराकीर्द–मुलाखत |
| ४ | डॉ. दत्तात्रेय तापकीर | FDP अंतर्गत विषय अध्यापनाच्या विविध पध्दती |
| ५ | डॉ. दीपक शेंडकर | शारीरिक शिक्षण व्यवसाय व त्यातील विकास |

| | | |
|---|---|---|
| | श्री उमेश बिबवे<br>श्री आनंद यादव | |
| ६ | डॉ.पीयूष पहाडे | नॅक मूल्यांकन व आयक्यूएसी रिपोर्ट |
| ७ | डॉ. विभा बिडवे | भारतीय संविधान |
| ८ | डॉ. सुधीर गाडे | भारतीय लोकशाही |
| ९ | डॉ वंदना बोकील | मराठी व्याकरणाची मूलभूत तत्त्वे |
| १० | श्रीमती गौरी सुनंदा | कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ |

- **निवृत्ती,नियुक्ती,पदोन्नती व धारणाधिकार**

  आयक्यूएसी च्या समन्वयक डॉ. श्रध्दा नाईक यांची एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालकपदावर नियुक्ती झाली आहे. ऑक्टोबर २०१९ पासून पाच वर्षांसाठी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकपदाचा धारणाधिकार राखून ठेवून त्यांनी ही नियुक्ती स्वीकारली आहे. ऑक्टोबर २०१९

- **दु:खद निधन**

  महाविद्यालयाच्या प्रारंभापासून सेवेत असलेले विद्यार्थीप्रिय सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ.प.म.आलेगांवकर यांचे दि.११ मे २०१९ रोजी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले.

- **इमारतीचे विस्तारीकरण**

  महाविद्यालयाच्या इमारतीचे एका मजल्याचे ६००० स्क्वेअर मी.चे बांधकाम सुरू करण्यात आले असून यामध्ये पाच वर्गखोल्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रीय मंडळाचे सरचिटणीस, मा.श्री धनंजय दामले यांचे खंबीर पाठबळ आणि आमचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांचे सहकार्यामुळे महाविद्यालय प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

**(डॉ. सोपान एकनाथ कांगणे)**
**प्राचार्य**
**चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय**
**गुलटेकडी,पुणे ३७**

**दि.२६/०६/२०२०**